महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५८ /२०२२ दि. १५/०८/२०२२

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** शहर वाहतुक शाखा, डोंबिवली हद्दीत दि. १७/०८/२०२२ रोजी रात्रौ २४:०० ते दि. १९/०८/२०२२ रोजी रात्रौ २४.०० वाजेपावेतो **''गोपाळकाला''** सणामिमित्त डोंबिवली पश्चिम परिसरातील दिपेश म्हात्रे फाउंडेशन तर्फे पंडित दिनदयाळ रोड वरील गणपती मंदिर रोड ते सम्राट चौक येथील व्यंकटेश दर्शन बिल्डींग या परिसरात ४० X २४ फुट लांबी रूंदीचा मंडप उभारण्यात येणार असून त्याकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी परवानगी दिली आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार असून वाहतूक कोंडी होवून नागरिकांना त्रास होवू नये याकरीता डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून पंडित दिनदयाळ रोडने सम्राट चौक कडे जाणारी व सम्राट चौक कडून डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशनकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात यावी, वाहतुक सुरळीत व सुनिश्चित व्हावी तसेच नागरीकांची गैरसोय होवू नये याकरीता, **आम जनतेच्या सोईसाठी.**

**त्याअर्थी,** मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११९६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद :–** १) डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून पंडित दिनदयाळ रोडने सम्राट चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गणपती मंदिर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने गणपती मंदिराजवळ डावीकडे वळण घेवून जी.एन.गॅरेज, येलोरा सोसायटी कडून सम्राट चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** २) पंडित दिनदयाळ रोडने ठाकूरवाडी तसेच रेतीबंदर चौक कडून सम्राट चौक मार्गे डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना सम्राट चौक, व्यंकटेश सोसायटी येथे **प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने सम्राट चौक कडून डावीकडे वळण घेवून नाना शंकर शेठ रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतुक अधिसुचना दि. १७/०८/२०२२ रोजी रात्रौ २४:०० ते दि. १९/०८/२०२२ रोजी रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

–मा. पोलीस आयुक्त,ठाणे शहर

–मा. पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर

–मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव –**

– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण.

– पोलीस उप आयुक्त,परिमंडळ – ३, कल्याण.

– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/–सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर**

– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

२/– आपणास विनंती करण्यात येते की,आपण मोटार वाहन कायद्याचे कलम १६१(१)(अ)(ब) अन्वये संबंधीत ठिकाणी वाहन पार्किंग फलक लावणेबाबत आपले अधिनस्थ संबंधीतांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.

CamScanner